महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

■ वर्ष : ११ अंक : ५ पाने : १२ ■ ऑगस्ट-सप्टेंबर २०१७ ■ E-Magazine visit us on : www.mahatransco.in

***प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,***

महापारेषण ही ४४,००० पेक्षा जास्त सर्किट कि.मी. ट्रान्समिशन वाहिन्या, ६५० पेक्षा अधिक EHV उपकेंद्रे आणि १,१९,००० पेक्षा जास्त एमव्हीए ट्रान्सफॉर्मेशन क्षमता असलेली भारतातील सर्वात मोठी पारेषण कंपनी आहे. तसेच कंपनीकडे १५०४ Ckt KM लांबीची ३५८२ एमव्हीएची ५०० के.व्ही. द्विष्ट-धारा एचव्हीडीसी लाईन चंद्रपूर ते पडघेसुद्धा कार्यरत आहे. 'महापारेषण'चे हे विद्युत जाळे संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये पसरलेले असून वैयक्तिक कार्याशिवाय, तत्पर संवाद व हाताशी असलेली माहिती हाच 'महापारेषण'च्या उत्कृष्ट कामगिरीचा मूलमंत्र आहे. 'महापारेषण'च्या मालकीची इतकी प्रचंड मालमत्ता

- *महापारेषण आणि आरआरएससीमध्ये जानेवारी २०१७ मध्ये सामंजस्य करार*
- *महापारेषणअंतर्गत इएचव्ही उपकेंद्राचे मॅपिंग पूर्ण*
- *एचव्हीडीसी व ४०० के.व्ही. इएचव्ही वाहिन्यांच्या जाळेचे मॅपिंग पूर्ण*
- *२२० के.व्ही. इएचव्ही वाहिन्यांचे मॅपिंग पूर्ण*
- *१३२/११०/१०० केव्ही इएचव्ही वाहिन्यांच्या मॅपिंगचे काम प्रगतीपथावर*

व तिच्या पायाभूत सुविधांची देखभाल तसेच नवीन प्रकल्पांची व्यवहार्यता ठरविण्यासाठी भौगोलिक-स्थानिक प्लॅटफॉर्मवर (GIS) मालमत्ता असण्याची गरज भासू लागली. ज्यामुळे मालमत्ता ठिकाणाची भौगोलिक परिस्थिती व निर्णय प्रक्रियेत सहकार्य मिळण्यास मदत होईल.

'महापारेषण'साठी भौगोलिक माहिती प्रणाली (GIS) प्लॅटफॉर्मची अंमलबजावणी करण्यासाठी विविध सरकारी व खाजगी संस्थांशी संपर्क साधण्यात आला. तथापि, या कार्यक्षमतेच्या अंमलबजावणीसाठी अधिकची आर्थिक तरतूद लागत असल्याचे निदर्शनास आले. पुढे, GIS ची प्रतिमा विशिष्ट कालावधीनंतर अद्ययावत करायची असेल तर अतिरिक्त किंमतीची आवश्यकता भासू लागली. अशा वाढीव खर्चामुळे हा GIS प्रकल्प तात्पुरता घेण्यात आलेला नव्हता.

दरम्यान, सप्टेंबर २०१६ मध्ये असे लक्षात आले की, इस्रोने (ISRO) भूवन-प्लॅटफॉर्म नावाचा स्वतःचा भौगोलिक प्लॅटफॉर्म सुरु केलेला आहे जो सरकारी यंत्रणांना मोफत सेवा देईल. 'महापारेषण'नी आरआरएससी-सेंट्रल, नागपूरशी (इस्रोचे रिमोट सेन्सिंग सेंटर) संपर्क साधून 'महापारेषण'च्या भौगोलिक माहिती प्रणालीच्या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी चौकशी केली. प्रकल्पावर तपशीलवार चर्चा केल्यानंतर, महापारेषण आणि आरआरएससी यांच्यात जानेवारी २०१७ मध्ये एक सामंजस्य करार करण्यात आला व प्रकल्पाची अंमलबजावणी सुरु झाली.

महापारेषण अंतर्गत इएचव्ही उपकेंद्राचे मॅपिंग पूर्ण झाले आहे. एचव्हीडीसी व ४०० के.व्ही.इएचव्ही वाहिन्यांच्या जाळेचे मॅपिंग पूर्ण झाले आहे. २२० के.व्ही. इएचव्ही वाहिन्यांचे मॅपिंग पूर्ण झाले आहे. काही भविष्यकालीन योजनाही प्रगतिपथावर आहेत. यामध्ये १३२/११०/१०० के.व्ही. इएचव्ही वाहिन्यांचे मॅपिंग डिसेंबरपर्यंत होईल. भौगोलिकरित्या मॅप केलेली पायाभूत सुविधा, ERP SAP यंत्रणेशी संलग्न करून आणि भौगोलिक व्यासपीठावर उपलब्ध करून निर्णय समर्थन प्रणाली विकसित केली जाणार आहे.

हा प्रकल्प सर्व महापारेषण कर्मचाऱ्यांसाठी आणि उच्चस्तरीय व्यवस्थापनात त्यांच्या नियमित कामात आणि निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत मदत करेल. प्रकल्पाची सुरवात २०१६ मध्ये झाली. कमी किंमतीत RRSC सेंट्रल, नागपूर व NRSC हैद्राबाद (इस्रोचा भारतीय भौगोलिक प्लॅटफॉर्म) यांच्या भूवन व्यासपीठाचा पुरेपूर उपयोग करून या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. 'महापारेषण'च्या माहिती व तंत्रज्ञान आणि ईआरपी पीएम Team ने स्वबळावर हा प्रकल्प विकसित केलेला आहे. या प्रकल्पामध्ये उपकेंद्र व वाहिन्यांची (सुमारे ४०,००० मनोरे) माहिती व त्यांचे मॅपिंग 'महापारेषण'च्या ११ सदस्यीय अभियंत्यांनी चार महिन्यांच्या कालावधीत



**राजीव कुमार मित्तल (भा.प्र.से.)**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

प्रत्येक कार्यक्षेत्रात जाऊन गोळा केलेली आहे. तसेच त्या माहितीचे मॅपिंगसुद्धा केले आहे. ही प्रणाली सर्व महापारेषण उपकेंद्रे आणि ५०० के.व्ही. एचव्हीडीसी, ४०० के.व्ही. आणि २२० के.व्ही. वाहिन्याचे (मनोऱ्यांसह) मॅपिंग पूर्ण करून कर्मचारी व व्यवस्थापनाला वापरण्यासाठी तयार झालेली आहे. भौगोलिक संदर्भासह महापारेषण उपकेंद्राची माहिती पाहण्याची सुविधा कोणत्याही आवश्यक निकषानुसार पाहण्यास आणि मुद्रित करण्यासाठी देण्यात आली आहे. विशिष्ट उपकेंद्र आणि त्यांच्याशी संबंधित सर्व माहिती पाहणे, उपकेंद्राची एकेरी रेखाचित्र दाखविणे (Single line Diagram), उपकेंद्राचा दूरध्वनी संपर्क क्रमांक पाहणे, भौगोलिक आणि छापण्यायोग्य स्वरुपात उपकेंद्राची जिल्हा पातळीवर, विभागानुसार, परिमंडळ/मंडळस्तरावर माहिती उपलब्ध करणे, निर्मितीशी संबंधित/संलग्न असलेल्या उपकेंद्राचा तपशील, विद्युत दाबाप्रमाणे उपकेंद्राची माहिती पाहता येणार आहे.

**आपणास व आपल्या कुटुंबियास दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा..!**
**Happy & Safe Diwali!**

**- राजीव कुमार मित्तल**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक




**मंत्रालय, मुंबई :** मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी ऊर्जा विभागातील विविध योजनांचा आढावा घेतला. याप्रसंगी ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव श्री. प्रवीण परदेशी, ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री. अरविंद सिंह, 'महावितरण'चे व्यवस्थापकीय संचालक श्री. संजीव कुमार, केंद्र शासनाच्या ग्रामीण विद्युतीकरण विभागाचे संचालक डॉ. पी. व्ही. रमेश, 'महानिर्मिती'चे व्यवस्थापकीय संचालक श्री. बिपीन श्रीमाळी, 'महापारेषण'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल.

## ■ मुख्यमंत्र्यांनी घेतला ऊर्जा विभागाचा आढावा ■

# कृषीपंप वीज जोडणीसाठी निधी देणार : मुख्यमंत्री

■ *टीम महापारेषण, मुंबई*


दुष्काळग्रस्त भागात कृषीपंप वीज जोडणीसाठी तसेच पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. यासाठी ११०५ कोटींचा प्रस्ताव विचाराधीन होता. यावेळी ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री. अरविंद सिंह, 'महावितरण'चे व्यवस्थापकीय संचालक श्री. संजीव कुमार, केंद्र शासनाच्या ग्रामीण विद्युतीकरण विभागाचे संचालक डॉ. पी. व्ही. रमेश, 'महानिर्मिती'चे व्यवस्थापकीय संचालक श्री. बिपीन श्रीमाळी, 'महापारेषण'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल उपस्थित होते.

शेतकऱ्यांना सिंचन सुविधा उपलब्ध होण्यासाठी कृषीपंप वीज जोडणी आवश्यक आहे. यासाठी महावितरण कंपनीने पायाभूत सुविधा वाढविण्यावर भर द्यावा. दहा लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आणण्यासाठी दोन लाख आठ हजार कृषीपंप पैसे भरून प्रलंबित आहेत. या प्रलंबित कृषी पंपांच्या ऊर्जीकरणासाठी 'महावितरण'ने निधी उभारण्याची सूचना मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी यावेळी केली.

केंद्र पुरस्कृत एकात्मिक ऊर्जा विकास योजनेतील रस्ता पुनर्स्थापनाचे दर हे महानगरपालिकानिहाय वेगवेगळे आहेत. हे दर एकसमान करण्याची सूचना त्यांनी केली.




**मुंबई :** केंद्र शासनाच्या ग्रामीण विद्युतीकरण विभागाचे संचालक डॉ. पी. व्ही. रमेश व 'महानिर्मिती'चे व्यवस्थापकीय संचालक श्री. बिपीन श्रीमाळी यांच्यात मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार झाला. याप्रसंगी ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण परदेशी.



***महापारेषणची उद्दिष्टे***

पारेषण प्रणाली सुरक्षित आणि स्थिर राखणे.





**नागपूर :** महापारेषण आणि इस्त्रो यांच्या वतीने भौगोलिक माहिती प्रणालीचे उदघाटन करताना राज्याचे ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, शेजारी नागपूर महापालिकेच्या महापौर सौ. नंदाताई जिचकार, नगरसेविका सौ. वर्षाताई ठाकरे, नगरसेवक श्री. अमर बागडे, महापारेषण कंपनीचे संचालक (संचलन) श्री. गणपत मुंडे.





## ■ भौगोलिक माहिती प्रणालीचे उदघाटन ■

# `महापारेषण`ने आधुनिकीकरणाची कास धरावी : चंद्रशेखर बावनकुळे

■ *टीम महापारेषण, नागपूर*

महापारेषण कंपनीने आधुनिकीकरणाची कास धरावी आणि २०३० पर्यंत २५ हजार के.व्ही.क्षमतेची वीज वाहून नेणारी सक्षम यंत्रणा उभी करून देशासमोर आदर्श निर्माण करावा, असे आवाहन राज्याचे ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

महापारेषण आणि इस्त्रो यांच्या वतीने नागपूर येथे भौगोलिक माहिती प्रणालीचे उदघाटन अमरावती मार्गावरील इस्त्रोच्या कार्यालयात झाले. त्यावेळी ते बोलत होते. ऊर्जामंत्री बावनकुळे म्हणाले, ``महापारेषण कंपनीच्या अधिकारी आणि कर्मचारी यांनी मेहनत घेऊन पारेषण उपकेंद्र, मनोरे यांची माहिती एका क्लिकवर उपलब्ध करून दिली आहे. यामुळे भविष्यात नवीन वाहिनी अथवा उपकेंद्र उभारतेवेळी सध्याची माहिती उपयुक्त ठरणार आहे. महापारेषण कंपनीने हे काम करून देशातील अन्य पारेषण कंपन्यांसमोर नवीन आदर्श निर्माण केला आहे. यावेळी ऊर्जामंत्री बावनकुळे यांच्या हस्ते महापारेषण आणि इस्त्रोच्या अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. या भौगोलिक माहिती प्रणालीविषयी माहिती देताना मुख्य अभियंता, (वाशी-ईआरपी) श्री. संजय शिंदे, म्हणाले, ही प्रणाली `महापारेषण`च्या दैनंदिन व्यवहारात कंपनीची कार्यक्षमता वाढविण्यास मदतीची ठरेल.`` या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून नागपूर महानगरपालिकेच्या महापौर सौ. नंदाताई जिचकार, नागपूर प्रभाग क्र. १३ च्या नगरसेविका सौ. वर्षाताई ठाकरे, सौ. परिणिता फुके, सौ. ऋतिका मसराम, नगरसेवक श्री. अमर बागडे उपस्थित होते. तसेच महापारेषण कंपनीचे संचालक (संचलन) श्री. गणपत मुंडे, कार्यकारी संचालक (मा.सं.) श्री. सूरज वाघमारे, नागपूर महापारेषण परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री.विकास बढे, अमरावती महापारेषण परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. भाऊराव राऊत उपस्थित होते. अधीक्षक अभियंता श्री. महेश भागवत यांनी आभार मानले.



## निवड



## `महापारेषण`च्या महाव्यवस्थापक (मा.सं.)पदी श्री. राजू गायकवाड

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या महाव्यवस्थापक (मा.सं.) पदी श्री. राजू गायकवाड यांची निवड झाली. दि.२६.०९.२०१७ पासून ते `महापारेषण`मध्ये महाव्यवस्थापक (मा. सं.) म्हणून रुजू झाले आहेत.

श्री. गायकवाड यांची तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये १९८९ मध्ये अनुकंपा तत्त्वावर वर्ग-४ या श्रेणीतील पदावर नियुक्ती झाली होती. त्यांनी सेवाकाळामध्ये पदव्युत्तर तसेच कार्मिक व्यवस्थापन पदवी पूर्ण केल्यानंतर थेट परीक्षेच्या माध्यमातून व्यवस्थापक (मा.सं.) म्हणून पुणे, वरिष्ठ व्यवस्थापक (मा.सं.) म्हणून अमरावती,सहाय्यक महाव्यवस्थापक म्हणन ईआरपीमध्येही काम केले. त्यानंतर त्यांची पदोन्नतीव्दारे उपमहाव्यवस्थापक (मा.सं.) म्हणून नेमणूक झाली होती. आता पदोन्नतीव्दारे महाव्यवस्थापक (मा.सं.) म्हणून नियुक्ती झाली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.




***औरंगाबाद :*** महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार संघटनेच्या वतीने वीज पारेषण कंपनीतील तांत्रिक कामगार कार्यशाळेच्या उदघाटनप्रसंगी `महापारेषण`चे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.), श्री. सुगत गमरे, शेजारी जि.प. अध्यक्षा ॲड..देवयानी डोणगावकर, संघटनेचे अध्यक्ष सर्वश्री बाबाजी वाकडे, एम.सी.वाळके, बी.एम.कांबळे, प्रेमसिंग राजपूत, सय्यद जहिरोद्दीन, आर.पी.थोरात, ताराचंद कोल्हे, भाऊसाहेब भाकरे, एस.आय.सय्यद.

# औरंगाबादमध्ये तांत्रिक कामगारांची कार्यशाळा

■ *टीम महापारेषण, औरंगाबाद*

महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार संघटनेच्या वतीने औरंगाबादमध्ये महसूल प्रबोधिनी सभागृहात वीज पारेषण कंपनीतील तांत्रिक कामगारांची कार्यशाळा घेण्यात आली. तसेच कामगारांच्या सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सुरवातीला या कार्यशाळेचे उदघाटन औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा ॲड. देवयानी डोणगावकर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी संघटनेचे अध्यक्ष श्री. बाबाजी वाकडे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून `महापारेषण`चे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुगत गमरे उपस्थित होते.

याप्रसंगी प्रभारी मुख्य अभियंता सर्वश्री एम.सी.वाळके, कार्यकारी अभियंता बी.एम.कांबळे, प्रेमसिंग राजपूत, संघटनेचे सरचिटणीस सय्यद जहिरोद्दीन, उपसरचिटणीस आर.पी.थोरात, कोषाध्यक्ष ताराचंद कोल्हे, मुख्यालय प्रतिनिधी भाऊसाहेब बाकरे, एस.आय.सय्यद, पुंडलिक काजे, आप्पाराव घुगे, हरिदास ताठे, शेख सलीम, पिशोर डहाके, पिशोर जाधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. एस.बी.कोळनूरकर यांनी केले तर आभार आर.पी.थोरात यांनी मानले.


## अभिनंदन



## वैष्णवी देशमुख हिचे सुयश


■ *टीम महापारेषण, औरंगाबाद*

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणेच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेत वैष्णवी संजय देशमुख हिने ८९.२३ टक्के गुण मिळविले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूरमध्ये तिला प्रवेश मिळाला आहे. अऊदा प्रकल्प विभाग औरंगाबाद अंतर्गत उपविभाग औरंगाबादमध्ये अतिरिक्त कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत असलेले श्री. संजय फकिरराव देशमुख यांची कु. वैष्णवी ही कन्या आहे.



***महापारेषणची उद्दिष्टे***

वीज गळती कमी करणे.



## अंकाची रंगसंगती आवडली

जून-जुलै २०१७ चा अंक पाहिल्यावर पहिल्यांदा मला अंकाची रंगसंगती खूपच भावली. पर्यावरणाचा हिरवा रंग मला तसा पूर्वीपासूनच खूप आवडतो. मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी त्यांच्या लेखात अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामगिरीबाबत व्यक्त केलेला विश्वास आम्हाला पुढील कामासाठी नक्कीच प्रोत्साहित करतो. मा.कार्यकारी संचालक (मानव संसाधन) यांचाही कार्यालयीन शिस्तीबाबतचा लेख आवडला. विशेष म्हणजे शासनाच्या ऊर्जाविषयक बातम्याही विस्तृत पध्दतीने वाचायला मिळाल्या. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पाल्याचे कौतुक अंकांतून होते, हे पाहून हुरुप आला. नाटकाच्या बातम्यांचे कव्हरेज चांगले होते. मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना दररोजचे काम सांभाळून सांस्कृतिक कार्यक्रमासाठी दिलेली परवानगी आमच्यासारख्या कर्मचाऱ्यांना महत्त्वाची होती. मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी आमचे केलेले कौतुक पाहून आम्ही भारावून गेलो. त्या कार्यक्रमाची बातमी आणि फोटो 'महापारेषण समाचार'मध्ये वाचून आनंद वाटला. संपूर्ण टीमचे मनापासून अभिनंदन...

**– श्री. संदीप नाथ**
तंत्रज्ञ श्रेणी-४, सक्रिय वाहिनी तळ, खारघर, नवी मुंबई.




## नवा 'लूक', नवा 'टच' आवडला

'महापारेषण समाचार' चा जून-जुलै २०१७ चा अंक वाचला. नवीन चांगले असे दृष्टीस पडले. फोटोंची, लेखांची निवड, थेट-भेट, शिक्षण-प्रशिक्षण, साद-प्रतिसाद, शाबासकी अशी हटके पंचलाईन खूपच आवडली. एकूणच अंकाची मांडणी पाहून भारावलो. साद-प्रतिसाद हे सदर छान वाटले. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संवादासाठी साद-प्रतिसाद हे एक नवं माध्यम म्हणून आपण उपलब्ध करून दिलं आहे, त्याबद्दल धन्यवाद...मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक व मा. कार्यकारी संचालक (मानव संसाधन) यांचे संदेश आवडले. अंकामध्ये नवीन बदल होतोय, हे जाणवले. एकंदरीतच, 'महापारेषण समाचार'चा नवा 'लूक', नवा 'टच' जाम आवडला, भविष्यातही चांगल्या उपक्रमांना आपल्या अंकात प्रसिद्धी मिळेल, अशी आशा करतो. पुढेही असेच दर्जेदार अंक प्रसिद्ध करावेत, अशी अपेक्षा करतो. आपल्या उपक्रमास खूप साऱ्या शुभेच्छा..!

**–श्री. श्रीकांत पेटकर**
कार्यकारी अभियंता, रा.पा.उ., सांघिक कार्यालय, मुंबई




## संवादासाठी हक्काचं व्यासपीठ

कर्मचारी व अधिकाऱ्यांसाठी 'महापारेषण समाचार' हे एक संवादाचे प्रभावी माध्यम आहे. मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, मा.कार्यकारी संचालक (मा.सं.) यांचे मौलिक संदेश 'महापारेषण समाचार'मधून वाचायला मिळतात. कर्मचारी व अधिकाऱ्यांना संवादासाठी हे एक नवं हक्काचं व्यासपीठ आहे. संवाद हा दोन्ही बाजूंनी (Two way Communication) होण्यासाठी साद-प्रतिसाद हा नवा स्तंभ सुरु केला आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या माध्यमांतून सुसंवाद साधायला मिळतोय. बैठकांचे इतिवृत्त, प्रशिक्षण शिबिरे, विविध उपक्रम, सकारात्मक पद्धतीने केलेल्या कामांची दखल आपण 'महापारेषण समाचार'मध्ये घेत आहात, ही कंपनीच्या दृष्टीने खूप सकारात्मक बाब आहे, असे वाटते.

**– श्री. महेश आंबेकर**
व्यवस्थापक (मानव संसाधन, तांत्रिक आस्थापना)सांघिक कार्यालय, मुंबई




## अंकाची आकर्षक मांडणी आवडली

जून-जुलै २०१७ च्या 'महापारेषण समाचार'मधील अंकाची मांडणी खूपच आवडली. मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, मा.कार्यकारी संचालक (मानव संसाधन) यांचे संदेश आवडले. वरिष्ठांना अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून कामांविषयी काय अपेक्षा आहेत, कंपनीचे पुढील ध्येय काय आहे? हे अंकांतून समजते. त्यामुळे 'महापारेषण समाचार' हा कंपनीचा आरसा म्हणून प्रतिबिंबीत होतो. अधिकाऱ्यांच्या नियुक्ती-निवृत्तीच्या बातम्या वाचायला मिळतात. कंपनीचे उपक्रम, घटना, घडामोडी समजतात.


**– श्री. संजय वाघमारे**
उपकार्यकारी अभियंता, बाळे मंडल कार्यालय, सोलापूर



*प्रिय अधिकारी व कर्मचारी,*
*महापारेषणमध्ये होणाऱ्या घटना, घडामोडी, तुम्ही केलेल्या चांगल्या कार्याची माहिती, लेख, कविता 'महापारेषण समाचार'साठी कृपया मोजक्या व समर्पक शब्दांत छायाचित्रांसह*
*prohr@mahatransco.in*
*या ई-मेलवर पाठवा, ही विनंती.*
***– संपादक मंडळ***



**महापारेषणची उद्दिष्टे** : संचलन, सुव्यवस्था व प्रकल्प उभारणीशी संबंधित विविध कामे करताना सुरक्षिततेची खातरजमा करणे.





**सुरवाणी, जि. नंदुरबार :** नियोजित १३२ के.व्ही. धडगाव उपकेंद्राचे भूमिपूजन करताना ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे. शेजारी पर्यटनमंत्री श्री. जयकुमार रावल, डॉ. हिना गावित, श्री. चंद्रकांत रघुवंशी, डॉ.विजयकुमार गावित, श्री. के.सी.पाडवी, श्री. ओमप्रकाश बकोरिया, डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी, श्री. रवींद्र चव्हाण, श्री. जयंत वीके व इतर मान्यवर.

### ■ धडगावच्या १३२ के.व्ही. विद्युत उपकेंद्राचे भूमिपूजन ■

# दुर्गम, आदिवासी भागातही दोन वर्षांत वीजपुरवठा : बावनकुळे

■ *टीम महापारेषण, नाशिक/नंदुरबार*

''सर्वांसाठी वीज या संकल्पनेखाली २०२२ पर्यंत प्रत्येक घरांपर्यंत वीज पोहोचविण्याचे केंद्र व राज्य शासनाचे धोरण आहे. दुर्गम, आदिवासी भागातील घरा-घरापर्यंत वीज पोहोचविण्याचे काम पुढील दोन वर्षांत पूर्ण केले जाईल. नंदुरबार जिल्ह्यातील घरोघरी पुढील दोन वर्षात वीजपुरवठा होईल,'' असे प्रतिपादन श्री. चंद्रशेखर बावनकुळे (मंत्री, ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा) यांनी केले.

सुरवाणी, ता.अकाणी, जि. नंदुरबार येथील नियोजित १३२ के.व्ही. धडगाव उपकेंद्राचे भूमिपूजन ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नंदुरबार जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे रोजगार हमी योजना व पर्यटनमंत्री श्री. जयकुमार रावल उपस्थित होते. कार्यक्रमास खासदार डॉ. हिना गावित, आमदार श्री. चंद्रकांत रघुवंशी, आमदार डॉ.विजयकुमार गावित, आमदार श्री. के.सी.पाडवी, 'महावितरण'च्या औरंगाबाद प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. ओमप्रकाश बकोरिया,नंदुरबारचे जिल्हाधिकारी डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी, 'महापारेषण'चे संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सुरवातीला प्रास्ताविक नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. जयंत वीके यांनी केले.

ऊर्जामंत्री श्री. बावनकुळे पुढे म्हणाले की, ''धडगाव तालुक्यातील भौगोलिक स्थिती लक्षात घेता वर्षातील ३६५ दिवसांपैकी ३२७ दिवस सौरऊर्जा उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे सौरऊर्जेवर चालणारे सौरपंप व उपकरणे नागरिकांना, शेतकऱ्यांना आदिवासी योजनेंतर्गत उपलब्ध होऊ शकतात. नंदुरबार जिल्ह्यातील घरोघरी पुढील दोन वर्षात वीजपुरवठा होईल.''

जिल्हाधिकारी, नंदुरबार यांना महापारेषण व महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन वीजपुरवठा देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना केल्या. यापूर्वी या उपकेंद्राच्या जागेची पाहणी महापारेषण कंपनीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल यांनी त्यांच्या ३० जून २०१७ रोजी झालेल्या नंदुरबार जिल्ह्याच्या दौऱ्यादरम्यान केली होती.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नाशिक परिमंडळांतर्गत कार्यरत अधीक्षक अभियंता सर्वश्री शरद लोखंडे, अऊदा स्थापत्य व बांधकाम मंडळ नाशिकचे प्रवीण भालेराव, अऊदा प्रकल्प मंडळ, नाशिकचे नासिर काद्री, चाचणी तथा दूरसंचार मंडळ, नाशिकचे जगन्नाथ चुडे, अऊदा संवसु मंडळ, भुसावळ तसेच सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) प्रमोद गोडसे, कार्यकारी अभियंता सुमंत मुंडे, अऊदा स्थापत्य प्रकल्प तथा सुव्यवस्था विभाग, जळगावचे विनोद ढोरे, अऊदा स्थापत्य व बांधकाम विभाग, नाशिकचे मोहन महाजन, अऊदा प्रकल्प जळगावचे भूषण पाटील, अऊदा प्रकल्प तथा संवसु परिमंडळ नाशिकचे मुख्य सहाय्यक सुरक्षा व दक्षता अधिकारी तानाजी वाघमारे यांनी परिश्रम घेतले.



***महापारेषणची उद्दिष्टे*** : रुपांतरण वर्धन क्षमतेचे (Transformation Capacity) लक्ष्य गाठणे.






**तळंदगे, जि.कोल्हापूर :** केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या वतीने प्रादेशिक प्रशिक्षण केंद्राची पाहणी करण्यात आली. यावेळी शिष्टमंडळासमवेत सर्वश्री आर.पी.पांडे, अनुप दास, सुरेशकुमार पाटील, सुधीर वानखेडे, शशिकांत बाकरे, अविनाश कसबेकर, इमाम सिद्धिकी, सुनील माने व इतर अधिकारी.

# तळंदगेमधील प्रादेशिक प्रशिक्षण केंद्राची पाहणी

■ *टीम महापारेषण, प्रशिक्षण*


केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या वतीने (CEA) कोल्हापूर जिल्ह्यातील तळंदगे येथील प्रादेशिक प्रशिक्षण केंद्राची पाहणी करण्यात आली. केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या वतीने संचालक श्री. आर.पी.पांडे व सहाय्यक संचालक, (मानव संसाधन) श्री. अनुप दास यांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रशिक्षण केंद्राच्या गेल्या तीन वर्षाच्या कामगिरीचा आढावा घेऊन प्रशिक्षण केंद्राच्या कामगिरीबाबत समाधान व्यक्त केले.

यावेळी महापारेषण कंपनीतर्फे कराड परिमंडळाचे मुख्य अभियंता सर्वश्री सुरेशकुमार पाटील, सांघिक कार्यालयाचे महाव्यवस्थापक (मानव संसाधन) सुधीर वानखेडे, अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) शशिकांत बाकरे, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) अविनाश कसबेकर, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) इमाम सिद्धिकी, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) सुनील माने उपस्थित होते.




**तळंदगे, जि.कोल्हापूर :** केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या वतीने प्रादेशिक प्रशिक्षण केंद्राची पाहणी करताना सर्वश्री आर.पी.पांडे, अनुप दास. शेजारी 'महापारेषण'चे सुरेशकुमार पाटील, सुधीर वानखेडे, शशिकांत बाकरे, अविनाश कसबेकर, इमाम सिद्धिकी, सुनील माने व अन्य अधिकारी.

केंद्र सरकारच्या विद्युत मंत्रालयांतर्गत कार्यरत असलेल्या केंद्रीय विद्युत प्राधिकरणातर्फे (CEA) प्रशिक्षण केंद्रांसाठी मान्यता घेणे आवश्यक असते. यासाठी प्राधिकरणाने नियुक्त केलेले अधिकारी प्रशिक्षण केंद्रास भेट देतात व निरीक्षण करून आपला अहवाल सादर करतात. यानुसार २०१७-२०२१ या कालावधीसाठी 'महापारेषण'च्या चंद्रपूर, अकोला, पडघे, बाभळेश्वर, वाळूज व जेजुरी येथील प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रांची निरीक्षणे करून मान्यता देण्यात आली.



***महापारेषणची उद्दिष्टे* :**
पारेषण वाहिन्यांचे लक्ष्य गाठणे.






**प्रकाशगड, मुंबई :** महानिर्मिती, महावितरण व महापारेषण यांच्या वतीने आयोजित मानव संसाधन अधिकाऱ्यांच्या एक दिवसीय कार्यशाळेत बोलताना म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनीचे संचालक श्री. विश्वास पाठक, शेजारी सर्वश्री सूरज वाघमारे, सचिन ढोले, विनोद बोंदरे, गणपत मुंडे, दिनेश साबू .

# मानव संसाधन अधिकाऱ्यांची एक दिवसीय कार्यशाळा

■ ***टीम महापारेषण, प्रशिक्षण***

महानिर्मिती,महावितरण व महापारेषण यांच्या वतीने आयोजित मानव संसाधन अधिकाऱ्यांची एक दिवसीय कार्यशाळा नुकतीच घेण्यात आली. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी श्री.विश्वास पाठक, संचालक-म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनी, तर प्रमुख अतिथी म्हणून श्री.दिनेश साबू, संचालक(प्रकल्प) महावितरण, श्री.गणपत मुंडे, संचालक(संचलन) महापारेषण, श्री. विनोद बोंदरे, कार्यकारी संचालक(मासं) महानिर्मिती, श्री. सचिन ढोले, कार्यकारी संचालक(मासं) महावितरण, श्री. सूरज वाघमारे, कार्यकारी संचालक(मासं) महापारेषण उपस्थित होते.

तसेच तीनही कंपन्यांचे मुख्य महाव्यवस्थापक(मासं), महाव्यवस्थापक(मासं), उप महाव्यवस्थापक(मासं), सहाय्यक महाव्यवस्थापक(मासं) उपस्थित होते. यावेळी तिन्ही कंपन्यांच्या वतीने स्वतंत्र सादरीकरण करण्यात आले. वीज क्षेत्राची सद्यस्थिती, आव्हाने, स्पर्धा व आगामी वाटचाल याबाबत मानव संसाधन धोरणविषयक अनेक बाबींवर यावेळी विचारमंथन झाले.




**प्रकाशगड मुख्यालय, मुंबई :** मानव संसाधन अधिकाऱ्यांच्या एक दिवसीय कार्यशाळेत महानिर्मिती कंपनीचे सादरीकरण करताना महाव्यवस्थापक (मानव संसाधन) सर्वश्री श्री. मारुती भंडारवाड. शेजारी सूरज वाघमारे, सचिन ढोले, विनोद बोंदरे, विश्वास पाठक, गणपत मुंडे, दिनेश साबू.

---

# तळंदगेत सहाय्यक अभियंता यांचे प्रशिक्षण संपन्न

■ ***टीम महापारेषण, प्रशिक्षण***

महापारेषण कंपनीच्या सरळसेवा भरती योजनेव्दारे निवड झालेल्या सहाय्यक अभियंता यांचे पायाभूत प्रशिक्षण घेण्यात आले. सदरचे प्रशिक्षण महापारेषण कंपनीच्या सातही प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रामध्ये एकाचवेळी घेण्यात आले.

प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, तळंदगे (कोल्हापूर) येथे आयोजित करण्यात आलेल्या सदर प्रशिक्षणाच्या सांगता



**तळंदगे (कोल्हापूर) :** प्रशिक्षणार्थ्यांसोबत कार्यकारी संचालक (मा.सं.) सर्वश्री सूरज वाघमारे, सुरेशकुमार पाटील, रंगनाथ चव्हाण, अरविंद दडमल व अन्य.

समारंभास कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्री. सूरज वाघमारे उपस्थित होते. श्री. वाघमारे यांनी प्रशिक्षण कालावधीत घेण्यात आलेल्या विविध विषयांचा व उपक्रमांचा आढावा घेतला. त्यांनी प्रशिक्षणार्थ्यांशी वार्तालाप केला. यावेळी कराड परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. सुरेशकुमार पाटील, अधीक्षक अभियंते श्री. रंगनाथ चव्हाण व श्री. अरविंद दडमल उपस्थित होते.

चंद्रपूर, अकोला, बाभळेश्वर, वाळुंज, पडघे व जेजुरी येथील प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रामध्ये आयोजित करण्यात आलेल्या सांगता समारंभास प्रशिक्षण केंद्रप्रमुख, सहप्रमुख व समन्वयक व सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) उपस्थित होते.



**प्रकाशगड, मुंबई :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राचे अनावरण करताना श्री. अरविंद सिंह. सोबत तिन्ही कंपन्यांचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक सर्वश्री संजीव कुमार, बिपीन श्रीमाळी, राजीव कुमार मित्तल तसेच 'महावितरण'च्या औरंगाबाद विभागीय कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. ओमप्रकाश बकोरिया.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राचे अनावरण

■ *टीम महापारेषण/टीम महावितरण, मुंबई*

महावितरण व महानिर्मिती कंपनीचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगड इमारतीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राचे अनावरण महाराष्ट्र शासनाच्या ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव तथा महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. अरविंद सिंह यांच्या हस्ते करण्यात आले.

शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने प्रकाशगड इमारतीत तळमजल्यावरील दर्शनी भागात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राचे अनावरण श्री. अरविंद सिंह यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी 'महावितरण'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजीव कुमार, 'महानिर्मिती'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. बिपीन श्रीमाळी, 'महापारेषण'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल तसेच 'महावितरण'च्या औरंगाबाद विभागीय कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. ओमप्रकाश बकोरिया व महावितरण आणि महानिर्मितीचे अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## *डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे मला मिळाली प्रेरणा*




**श्री. पराग कर्वे**

*मला माझे मित्र अभय राजाध्यक्ष म्हणाले, ''अरे पराग, एम.एस.ई.बी.मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे तैलचित्र करायचे आहे. तू करशील का? खरं म्हणजे मला खूपच आनंद झाला. एवढ्या मोठ्या महामानवाचे चित्र रेखाटण्याचे काम मला मिळणे म्हणजे माझे किती मोठे भाग्य..! त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पोर्ट्रेट करण्याचा आनंद काही औरच होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर बॅरिस्टर झाले, त्यावेळच्या त्याच ड्रेसमधील चित्र हुबेहुब साकारायचे होते. मी खूप आनंदित झालो. पण, चित्र रेखाटताना अचानक मला स्लीप डिस्कचा ॲटॅक आला. मात्र, त्या परिस्थितीतही मी माझे काम थांबविले नाही. अवघ्या वीस दिवसांत हे चित्र रेखाटले. हे काम पूर्ण करण्याची ताकद मला खुद्द डॉ. बाबासाहेबांनीच दिली, असं मला मनोमन वाटतं.'' श्री. कर्वे यांनी मुंबईतील जे.जे.इन्स्टिट्यूटमधून चित्रकलेचे शिक्षण घेतले आहे. त्यांच्या पत्नी ज्योतिकाही त्यांना या कामात मदत करतात.*



***महापारेषणची उद्दिष्टे*** : परस्परांच्या हितांची जपणूक, विश्वास, पारदर्शकता व मोकळ्या संवादाची संस्कृती व्यवस्थापनात रुजविणे






# प्रायोगिक तत्त्वावरील AMR प्रकल्पाची अंमलबजावणी

## ■ ड्युअल सिमवर आधारित प्रकल्प; महापारेषण कंपनीच्या शिरपेचात मानाचा तुरा ■

■ *टीम महापारेषण, कळवा*

*भारतातील इतर राज्यात AMR प्रकल्प सिंगल सिमवर आधारित असतानाही महाराष्ट्रात 'महापारेषण'ने ड्युअल सिम मॉडेमची यशस्वीरित्या चाचणी केली. ही चाचणी यशस्वी झाल्यानंतर तब्बल २५ मीटरवर प्रायोगिक तत्त्वावर AMR प्रकल्पाची अंबलबजावणी यशस्वीरीत्या करण्यात आली. प्रायोगिक तत्वावर राबवण्यात आलेल्या AMR प्रकल्पाच्या यशानंतर यापुढील टप्प्यात २७९ मीटरवर हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. विशेष म्हणजे अशा प्रकारच्या ड्युअल सिमवर आधारित प्रकल्प राबविणारी महापारेषण कंपनी ही भारतातील पहिली कंपनी ठरली आहे.*

*इतर राज्यांमध्ये अस्तित्वात असलेल्या ऑटोमेटेड मीटर रिडींग (AMR ) प्रकल्पाचा आढावा घेऊन महाराष्ट्रातही असा प्रकल्प कार्यान्वित करावयाची सूचना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल यांनी अधीक्षक अभियंता, (ऊर्जा लेखांकन) यांना व त्यांच्या टीमला दिली. त्यानुसार श्री. ई. टी. ढेंगळे, अधीक्षक अभियंता (ऊर्जा लेखांकन) व एम. आर देवळे, कार्यकारी अभियंता (दूरसंचार) यांनी इतर राज्यातील अस्तित्वात असलेल्या प्रकल्पांचा अभ्यास केला.*

*ड्युअल सिम मॉडेममध्ये बुद्धिमान संभाषण (Intelligent Communication )करण्याची क्षमता असल्याने दोन्ही सिग्नलची उच्च पातळी असणारे नेटवर्क स्वयंचलितरित्या स्विच होऊन अविरत डेटा (Uninterrupted data ) येण्यास मदत होते.*

*सदर कामामध्ये डॉ.एस. एस.कुलकर्णी, मुख्य अभियंता ( महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र,ऐरोली) यांचे सहकार्य लाभले. प्रायोगिक तत्त्वावरील AMR प्रकल्प यशस्वीरित्या राबविणाऱ्या ऊर्जा लेखांकन टीम मध्ये श्री. व्ही. बी. आवारे (कार्यकारी अभियंता), सौ.आर. बी. मालगोंडे (अतिरिक्त कार्यकारी अभियंता), श्री. अमित वाळा (सहाय्यक अभियंता) हे सहभागी होते.*

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती/निवृत्ती माहे ऑगस्ट-सप्टेंबर २०१७

### नियुक्ती

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | नरेशकुमार सहदेवराव तेलतुंबडे | मुख्य अभियंता, (पारेषण) | सांघिक कार्यालय, मुंबई | १६.०८.२०१७ |
| २. | राजीव मुकुंद देव | अधीक्षक अभियंता, (पारेषण) | अउदा, संवसु मंडळ, अकोला | २४.०८.२०१७ |

# 'महापारेषण'मध्ये ७० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा



■ ***टीम महापारेषण, मुंबई***

महापारेषणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा इमारतीमध्ये ७० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच 'महापारेषण'च्या सात परिमंडळ कार्यालयांमध्येही स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम घेण्यात आले.

प्रकाशगंगा येथील मुख्यालयात 'महापारेषण'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल यांनी ध्वजारोहण केले. यावेळी 'महापारेषण'चे संचालक (प्रकल्प) सर्वश्री रवींद्र चव्हाण, संचालक (संचलन) गणपत मुंडे, संचालक (वित्त) विनायक साठे, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) सुधीर वानखेडे, मुख्य सुरक्षा अधिकारी संजय कुमार, शिष्टाचार अधिकारी अनिल कुमार यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



२

१. ***प्रकाशगंगा इमारत, मुंबई :*** *'महापारेषण'च्या मुख्यालयात ध्वजारोहणप्रसंगी मानवंदना देताना 'महापारेषण'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल.*

२. *ध्वजारोहणप्रसंगी मानवंदना देताना मुख्यालयातील अधिकारी व कर्मचारी वर्ग.*

१



सूरज वाघमारे
कार्यकारी संचालक (मासं)

# नस्ती व टिप्पणी कशी असावी

कोणतेही कार्यालय किती चांगल्या पद्धतीने चालते आहे, हे त्या कार्यालयातील सर्व वर्गातील कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते आणि सर्वांचीच कामे तेवढीच महत्त्वाची असतात. अर्थात कार्यालयातील कागदपत्रे किती जलद, चांगल्या पद्धतीने आणि सुरक्षितपणे फिरतात, यावर ही कार्यक्षमता मोजली जाते, कारण त्यावर ग्राहकांचे, कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे आणि कंपनीचे काम किती चांगल्या पद्धतीने होते, हे ठरत असते. अगदी अलीकडच्या काळात



झिरो पेंडन्सी आणि कागदपत्रे कशी फिरतात, याची नोंद ठेवण्याची पद्धत आली आहे. त्यामुळे फाईल किंवा कागदपत्रे नेमकी कोठे आणि किती काळ थांबली आहेत, याचीही नोंद होत असते. हे सर्व आवश्यक आहे, कारण, आपल्या सर्वांनाच कार्यक्षमता वाढवायची आहे. ती आजच्या काळाची गरज आहे आणि त्यावरच आपल्या कंपनीची प्रतिमा आणि आपले कामाचे समाधान अवलंबून आहे. सुरवातीला म्हटले तसे नस्ती आणि टिप्पणीला कार्यालयीन कामांत विशेष महत्त्व आहे. त्यामुळे नस्ती आणि टिप्पणी कशी असावी, हे आपण यावेळी मुद्देसूद पाहू.

- नस्ती व अभिलेख वर्गीकरण व त्यांचे नियोजन हा या कामाचा एक महत्त्वाचा भाग आहे. कारण त्यावर कागदपत्रांचा पुढील प्रवास अवलंबून आहे.
- वरिष्ठ काही माहिती मागत असतात आणि त्यांना कमी वेळांत काही महत्त्वाचे निर्णय घ्यायचे असतात, त्यामुळे त्यांना नेमकी काय माहिती हवी, याबाबत नेमकेपणाने आवश्यक तीच माहिती दिली पाहिजे. त्यात अवाजवी माहिती किंवा विषयांतर असता कामा नये.
- टिप्पणीवर वरिष्ठांना काही नोंदी करायच्या असतात, अनेकांची सही त्यावर होणे अपेक्षित असते. त्यामुळे टिप्पणी तयार करताना समास किती सोडला पाहिजे, टिप्पणीच्या सुरवातीला आणि शेवटी किती जागा सोडली पाहिजे, याचे प्रमाणीकरण एकदाच करून घेतले की ते ठरविण्यात प्रत्येकवेळी वेळ जात नाही आणि आपल्या कामाला वेग येतो.
- नस्ती टॅगच्या सहाय्याने व्यवस्थित बांधून सादर करावी. म्हणजे त्यातील कागदपत्रे सुरक्षित राहतील.
- प्रकरण नोंदवही कशा पद्धतीने तयार करून अद्ययावत करावी, याचेही प्रमाणीकरण करून ठेवावे, म्हणजे आपल्या वरिष्ठांना कमी वेळेत एखाद्या प्रकरणाची ताजी स्थिती पटकन मिळू शकेल.
- अनेकदा कार्यालयातील स्टेशनरी, साधनसामुग्री खरेदीबाबत काही काळ जाऊ शकतो आणि त्यामुळे कामाचा खोळंबा होतो. त्यामुळे त्यावर लक्ष ठेवून त्याविषयीची टिप्पणी सुटसुटीत व व्यवस्थित लिहिली तर त्याचे नियोजन चांगले होऊ शकते.
- कार्यालयाशी होणारा पत्रव्यवहार आणि त्यावर आपण करत असलेले मार्किंग आणि वितरण यालाही महत्त्व आहे. त्या कामाची सुरवात तेथून होते, त्यामुळे सुरवातीलाच सर्व विचार करून ठेवण्याची चांगली सवय लागू शकते.
- अंदाजपत्रकीय तरतूद, अस्थाई पदे व भविष्यातील प्रकल्प चालू ठेवण्याबाबतचे प्रस्ताव हा कार्यालयीन कामाचा महत्त्वाचा भाग आहे. याबाबतच्या तारखावार नोंदी आपल्याकडे असल्या पाहिजेत.
- गोपनीय अहवाल जतन करणे, त्यासंबंधी पत्रव्यवहार करणे आणि ते अद्ययावत ठेवणे, ही आपल्यावर मोठी जबाबदारी असते. अशा अहवालांची संवेदनशीलता लक्षात घेता त्यांना सुरक्षित जागा देणे आवश्यक असते. त्या अहवालाची वाच्यता कोठे न करणे, हाही आपल्या कामाचा आणि विश्वासार्हतेचा भाग असतो. ती आपण जपलीच पाहिजे.
- शासकीय पत्र नोंदवही, विधानसभा-विधानपरिषद नोंदवही, दूरध्वनी नोंदवही आणि त्याच्याशी संबंधित पत्रव्यवहार करण्याची वेळ वर्षातून कमी वेळा येत असेल तर त्याचे वर्गीकरण चांगले करून ठेवले तर ती कागदपत्रे वेळच्यावेळी सापडतात. ही कागदपत्रे कंपनीच्या धोरणात्मक दृष्टीने महत्त्वाची असल्याने त्यांचीही विशेष काळजी घेणे अपेक्षित आहे.
- माहितीचा अधिकार हा कार्यालयीन काम पारदर्शक होण्यासाठीचा एक पुढाकार आहे. त्यामुळे माहितीच्या अधिकारा संबंधित प्रशासन विभाग शाखेची माहिती सहायक शासकीय माहिती अधिकारी यांना आवश्यकतेनुसार उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.
- वेतनवाढ, बडतर्फी, राजीनामा, हजेरीपत्रक, कार्यभार हस्तांतरण प्रमाणपत्रे, रजा हिशोब, चौकशी अहवाल, सेवापुस्तक (सेवानिवृत्तीनंतर) ना हरकत प्रमाणपत्र, टेबल तपासणी, किरकोळ रजा अर्ज, पगारपत्र प्रमाणपत्र, अंदाजपत्रकाच्या अटी व नोंदवह्या, कार्यालयीन संकीर्ण पत्रव्यवहार या सर्व प्रशासकीय बाबी आहेत. त्यातील अनेक गोष्टी या दररोज लागतात. त्यामुळे त्या लवकर वापरता येतील अशा ठेवणे, त्यावर ठळक त्या-त्या बाबींचा उल्लेख करणे आणि त्यातील अनियमितता वरिष्ठांच्या लक्षात आणून देणे आवश्यक असते. अनेकदा दररोजचेच आहे म्हणून अशा नोंदीना कमी महत्त्व दिले जाते, पण त्या शिस्तीवरच कार्यालयीन शिस्त बसत असते, हे लक्षात घेऊन त्यात नियमितता आणली पाहिजे. अशा नोंदीत फार वेळ जाणार नाही, याचीही काळजी घेतली गेली पाहिजे.

**शुभेच्छांसह..!**

**- सूरज वाघमारे**

**कार्यकारी संचालक (मानव संसाधन)**

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by PRO for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts :** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.